POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२१५ ● मुंबई, सोमवार, ०९ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



## भारतीय संघ चॅम्पियन...
### पुन्हा एकदा टी-20 वर्ल्ड कप जिंकला

## घरच्या मैदानात इतिहास रचला...
# न्यूझीलंडला दिली मात

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात फायनल सामना रंगला. या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत 255 धावांचा डोंगर उभारला. न्यूझीलंडला फायनल सामन्यात 159 धावा करु शकले. भारतीय संघाने फायनल सामना 96 धावांनी जिंकला. भारतीय संघ 2026 चा टी-20 विश्वचषकाचा फायनल सामना जिंकला आणि चॅम्पियन बनला. फायनल सामना जिंकताच भारतीय संघाने इतिहास रचला.

अभिषेक शर्मा, संजू सॅमसन आणि इशान किशन यांच्या स्फोटक खेळीच्या जोरावर भारताने 255 धावांचा मोठा आकडा उभारला आणि न्यूझीलंडसमोर विजयासाठी 256 धावांचे लक्ष्य ठेवले. अभिषेक आणि संजू यांनी केवळ 7.1 षटकांत 98 धावांची सलामी भागीदारी करत टीम इंडियाला चांगली सुरुवात दिली. टीम इंडियाने आयसीसी टी20 विश्वचषक फायनलच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली.

अभिषेकने 21 चेंडूत 52 धावा, संजू सॅमसनने 47 चेंडूत 89 धावा आणि इशान किशनने 25 चेंडूत 54 धावा केल्या. शेवटी दुबेने 8 चेंडूत 26 धावा केल्या. न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरने नाणेफेक जिंकली आणि भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. भारतीय संघाने सामन्यात कोणताही बदल केला नाही, तर न्यूझीलंडने एक बदल केला.

256 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंड कधीही विजयाच्या शर्यतीत नव्हता. टिम सेफर्टच्या 52 आणि कर्णधार मिचेल सँटनरच्या 43 धावा वगळता, इतर कोणत्याही किवी फलंदाजाला प्रभावी खेळी करता आली नाही. या सामन्यात डॅरिल मिशेलने 11 चेंडूत 17 धावा केल्या. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक चार बळी घेतले. अक्षर पटेलने तीन फलंदाजांना बाद केले. हार्दिक पंड्या, वरुण चक्रवर्ती आणि अभिषेक शर्मा यांनीही प्रत्येकी एक बळी घेतला.

**भारतीय संघाने इतिहास रचला**

तिस यांदा ट्रॉफी जिंकणारा भारत पहिलाच देश ठरला. तर घरच्या मैदानावर टी-20 वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा पहिलाच देश ठरला. सलग दोन वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा पहिलाच देश ठरला. म्हणजे टी-20 विश्वचषक जिंकलाच नाही तर त्यासोबतच भारतीय संघाने इतिहास रचला.

## मार्च महिन्यात उष्णतेची लाट
### 3 जिल्ह्यांना तापमानाचा यलो अलर्ट



■मुंबई। प्रतिनिधी,

भारतीय हवामान विभागाच्या विभागाने 8 मार्च 2026 रोजी राज्यातील एकूण हवामान विभागाचा अंदाज वर्तवला आहे. राज्यात किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता असून, विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तसेच कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात कोरडं वातावरण राहण्याची शक्यता आहे. जाणून घेऊयात 8 मार्च रोजी राज्यातील हवामानाचा अंदाज.

- **कोकण** : कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे आणि मुंबईत हवामान विभागाने कोरड्या हवामानाचा अंदाज वर्तवला आहे. पुढील काही दिवसांमध्ये तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील 24 तासांत तापमानात काही प्रमाणात बदल होण्याची शक्यता आहे
- **मध्य महाराष्ट्र** : मध्य महाराष्ट्रात पुढील काही तासांत कमाल तापमानात फारसा बदल अपेक्षित नाही. येत्या काही दिवसांमध्ये 2 ते 3 अंशाने तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच वातावरण कोरडं राहण्याची शक्यता आहे.
- **मराठवाडा** : मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, नांदेड, परभणी, धाराशिवमध्ये हवामान कोरडं राहण्याची अधिक शक्यता आहे. पुढील काही तास महत्त्वाचे आहेत.
- **विदर्भ** : विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाण्यात उष्णतेत वाढ होईल. तसेच अमरावती, अकोला आणि वर्धामध्ये उष्णतेचा येलो अलर्ट जारी केला आहे.



## शासकीय योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





■ठाणे। प्रतिनिधी,

जागतिक महिला दिन आणि समाजसुधारक डॉ.मुत्थुलक्ष्मी रेड्डी यांच्या विधानमंडळ सदस्यत्वाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित ह्यविकसित भारत नारी शक्ती संगमह्ण ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेत महिलांना अधिकाधिक संधी दिल्यास सक्षम नेतृत्व घडते, यासाठी शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील राहिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मीरा-भाईंदरजवळील उत्तन येथे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम) यांच्या संयुक्त विद्यमाने ८ व ९ मार्च २०२६ रोजी ह्यविकसित भारत नारी शक्ती संगमह्ण या दोन दिवसीय ग्रामीण महिला नेतृत्व परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले.

यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे, पद्मश्री पोपटराव पवार, प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील, कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, मीरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, अपर तहसिलदार निलेश गौड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढणे ही काळाची गरज आहे. महिलांना योग्य संधी दिल्यास त्या प्रभावी नेतृत्व घडवू शकतात आणि समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शासनाच्या विविध योजनांद्वारे महिलांच्या सक्षमीकरणाला चालना दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले. ह्यलखपती दीदीह्ण योजनेंतर्गत यावर्षी ३७ लाख महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे उद्दिष्ट शासनाने ठेवले असल्याची माहिती त्यांनी दिली. उद्योग आणि स्टार्टअप क्षेत्रात महाराष्ट्रातील महिलांनी देशात अग्रक्रम मिळवला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या परिषदेत देशभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या सुमारे ५०० ग्रामीण महिलांचा सहभाग असून, व्यवसाय, उद्योग, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या यशस्वी वाटचालीचे अनुभव या व्यासपीठावरून मांडले जाणार आहेत.

यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त करताना, महाराष्ट्रातील निवडून आलेल्या तसेच भविष्यात निवडून येणाऱ्या महिला सरपंचांसाठी प्रशिक्षण शिबिरे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे आयोजित करण्यात यावीत, अशी सूचना केली. यामुळे सुशासनाला चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

परिषदेचे प्रास्ताविक प्रबोधिनीचे उपाध्यक्ष डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी केले. पद्मश्री पोपटराव पवार यांनी स्वागतपर भाषण केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

यावेळी विधान परिषद सदस्या रेखाताई महाजन तसेच मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर डिंपल मेहता यांची व्यासपीठावर विशेष उपस्थिती होती.

या परिषदेत ग्रामीण महिलांच्या नेतृत्व विकास, उद्योजकता आणि सामाजिक परिवर्तनातील योगदानावर विविध सत्रांमध्ये चर्चा होणार असून, काही विशेष महिलांचे प्रेरणादायी अनुभव कथनही सादर करण्यात येणार आहे.

## स्वामीनारायण मंदिराच्या बाथरुममध्ये तरुणींचा आढळला मृतदेह
# बाथरूममध्ये आढळलं भूलीचं इंजेक्शन

**सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन्ही मुली मंदिरातील बाथरूमकडे जाताना दिसतात**

संबंधित प्रकरणात एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं की, सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन्ही मुली मंदिरातील बाथरूमकडे जाताना दिसत आहेत. बाथरूमचा दरवाजा तोडून उघडला असता त्यात त्या बेशुद्ध अवस्थेत आढळल्या. एका मुलीला सिव्हिल रुग्णालयात आणि दुसऱ्याला स्माइमर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन्ही रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.



■मुंबई। प्रतिनिधी,

स्वामीनारायण मंदिराच्या बाथरूममध्ये दोन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे मृतदेह आढळल्यानंतर गुजरातमधील सुरत शहरात एकच खळबळ उडाली आहे. दोन्ही तरुणींचे वय हे 18 ते 20 वर्षे होते. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आणि संबंधित घटनेचा तपास देखील केला. पोलिसांनी शनिवारी सांगितले की, त्यांना घटनास्थळी भुलीचे इंजेक्शन आढळून आले होते. मृत्यूपूर्वी दोन्ही मुलींनी चॅटजीपीटीवर "आत्महत्या कशी करावी", याबद्दल शोध घेतला होता. ही घटना गुजरातमधील सूरतमध्ये घडल्याचं सांगण्यात येत आहे.

**स्वामीनारायण मंदिराच्या बाथरुममध्ये तरुणींचा आढळला मृतदेह**

संबंधित प्रकरणात पोलिसांनी सांगितले की, शुक्रवारी दुपारपासून दोन्ही विद्यार्थिनी या बेपत्ता झाल्या होत्या. त्यानंतर रात्री सानिया गावातील स्वामीनारायण मंदिराच्या बाथरुममध्ये ते मृतावस्थेत असल्याचे आढळून आले. त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांनी दिंडोली पोलीस ठाण्यात त्यांच्या बेपत्ताची तक्रार दाखल केली, फोन केला पण कोणीही प्रतिक्रिया दिली नाही. फोन लोकेशनचा शोध घेतल्यानंतर, पोलिसांनी एक पथक सानिया गावात पाठवले आणि त्यांचा तपास केला होता, त्यांना त्यांची एक स्कूटर ही मंदिराजवळ आढळून आली होती.

**बाथरूममध्ये आढळलं बेशुद्धीसाठी वापरले जाणारे भूलीचे इंजेक्शन**

बाथरूमची झडती घेतली असता, बेशुद्धीसाठी वापरले जाणारे भूलीचे इंजेक्शन सापडले, तर एका पीडितेच्या फोनच्या गॅलरीत आत्महत्येशी संबंधित काही फोटो सापडले. पोलिसांनी सांगितले की दोघे वेगवेगळ्या महाविद्यालयात शिकले होते आणि शाळेपासून चांगले मित्र होते. त्यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले याचा तपास सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## शेजारणीला 'मम्मी' म्हटले म्हणून तीन वर्षांच्या चिमुरडीला अमानुष मारहाण... डोळ्यात मिरची पूडही टाकली

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याणजवळील बापगाव परिसरात दत्तक घेतलेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शेजारच्या महिलेला "मम्मी" म्हणून हाक मारल्याच्या कारणावरून पालनकर्त्या आईने मुलीला मारहाण केली तसेच तिच्या डोळ्यांत तिखट टाकल्याचा गंभीर आरोप आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर



**शेजारणीला ३मम्मी३ म्हटल्याने संताप**

स्थानिकांच्या मते, किरकोळ कारणांवरूनही या मुलीवर वारंवार अत्याचार केला जात असल्याची तक्रार होती. अलीकडील घटनेत मुलीने शेजारच्या एका महिलेला ३मम्मी३ म्हणून हाक मारल्याने पालनकर्त्या आईचा संताप अनावर झाला. त्यानंतर तिने मुलीला बेदम मारहाण केली. इतकेच नव्हे तर तिच्या डोळ्यांत मिरची पूड टाकल्याचा आणि मिरची पूड तोंडात घालण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही प्रत्यक्षदर्शींनी केला आहे.

स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली असून पोलिसांनी प्रकरणाची दखल घेत कारवाई सुरू केली आहे.

**दांपत्याकडे संगोपनाची जबाबदारी**

मिळालेल्या माहितीनुसार, झंकार मोहल्ला परिसरात राहणाऱ्या दांपत्याने काही काळापूर्वी एका अल्पवयीन मुलीला सांभाळण्याची जबाबदारी घेतली होती. मुलीच्या आईचे निधन झाल्यानंतर तिच्या वडिलांच्या एका मित्राने तिच्या संगोपनाची जबाबदारी या दांपत्याकडे सोपवली होती.

या अत्याचाराचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर परिसरातील नागरिकांनी कठोर कारवाईची मागणी केली. या प्रकरणी पडघा पोलिसांनी दिलशाद शेख या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. तसेच मुलीच्या जैविक वडिलांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू असून तपासाच्या निष्कर्षानुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## नवरा मनोविकारतज्ज्ञ पत्नीच्या मनातलं कळलं नाही, डॉ. मनीषा जेजुकरने स्वतःला संपवलं! काय घडलं?

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिक शहरात एक अत्यंत वेदनादायी आणि धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील नामवंत आयुर्वेदिक डॉक्टर डॉ. मनीषा जेजुरकर (वय अंदाजे ४०) यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आयुष्य संपवले. या घटनेमुळे नाशिकच्या वैद्यकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, अनेकांनी शोक व्यक्त केला आहे. पण मनीषा यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले? असा प्रश्न अनेकांना पडला आहे. नेमकं प्रकरण काय आहे? जाणून घ्या...

**प्रकरण काय?**

डॉ. मनीषा जेजुरकर या गंगापूर रोड परिसरातील रेवती ब्ल्यू अपार्टमेंट, डी. के. नगर येथे कुटुंबासह राहत होत्या. शुक्रवारी (६ मार्च २०२६) सकाळी सुमारे ११:३० वाजता त्यांनी घरातील खिडकीच्या लोखंडी रॉडला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच त्यांना बेशुद्ध अवस्थेत जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.



**नवरा मनोविकारतज्ज्ञ**

विशेष म्हणजे, डॉ. मनीषा यांचे पती डॉ. नीलेश जेजुरकर हे नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयातील वरिष्ठ मनोविकारतज्ज्ञ आहेत. ते मानसिक आरोग्य, नैराश्य, तणावग्रस्त रुग्णांना उपचार आणि मार्गदर्शन देतात आणि समाजात मानसिक आरोग्य जागृतीचे कामही करतात. अशा तज्ज्ञाच्या घरातच अशी घटना घडल्याने अनेकांना हे अत्यंत विचित्र आणि दुःखद वाटत आहे.


डॉ. मनीषा जेजुरकर या नाशिकमध्ये कुशल आयुर्वेदिक तज्ज्ञ म्हणून ओळखल्या जात होत्या. आयुर्वेदिक उपचार, समुपदेशन आणि वैकल्पिक चिकित्सेच्या माध्यमातून त्यांनी अनेक रुग्णांना आरोग्य लाभ मिळवून दिला होता. त्यांच्या उपचार पद्धतीमुळे रुग्णांमध्ये त्या खूप लोकप्रिय होत्या. अशा यशस्वी आणि अनुभवी डॉक्टरने अचानक हे टोकाचे पाऊल उचलल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## ही केवळ धार्मिक नव्हे, राष्ट्रीय समस्या!




नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६' या प्रस्तावित कायद्याचा मसुदा संमत करण्यात आला. लवकरच याविषयीचा शासकीय निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी प्रसिद्धीमाध्यमांना दिली. मागील वर्षी राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली या प्रस्तावित कायद्याचा मसुदा सिद्ध करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने केलेल्या शिफारसींच्या आधारे हा मसुदा सिद्ध करण्यात आला आहे. बलपूर्वक, आमीष दाखवून किंवा फसवणूक करून होणारे धर्मांतर रोखण्यासाठी हा प्रस्तावित कायदा असणार आहे. या कायद्याचा मसुदा मंत्रीमंडळाने संमत केला असला, तरी याविषयीचे विधेयक राज्याच्या विधीमंडळामध्ये चर्चेला येईल, तेथे ते पारित होऊन राज्यपालांकडे संमतीसाठी पाठवले जाईल आणि राज्यपालांच्या संमतीनंतरच या विधेयकाचे कायद्यामध्ये रूपांतर होईल. सध्या विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू आहे. त्यामुळे या अधिवेशनामध्ये हे विधेयक सादर केले जाईल, अशी आशा आहे. दोन्ही सभागृहांत महायुतीचे बहुमत असल्यामुळे हे विधेयक विधानसभा आणि विधान परिषद यांमध्ये संमत होण्याला काही अडथळा येण्याची मुळीच शक्यता दिसत नाही. त्यामुळे चालू अर्थसंकल्प अधिवेशन राज्याला एक सक्षम 'धर्मांतरबंदी' कायदा देईल, अशी अपेक्षा आहे. या कायद्यामध्ये शिक्षेची आणि दंडाची कोणकोणती प्रावधाने आहेत, याविषयीची चर्चा प्रत्यक्षात कायदा अस्तित्वात आल्यानंतरच करणे उचित राहील; परंतु या निमित्ताने राज्यातील धर्मांतराचे स्वरूप आणि त्याचे विविध प्रकार जनतेसमोर यावेत, यासाठी त्याची चर्चा त्या निमित्ताने सभागृहात होणे अपेक्षित आहे. विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहांमध्ये भाजप, शिवसेना, मनसे, उद्धव बाळासाहेब ठाकरे आदी राजकीय पक्षांनी पक्षभेद विसरून धर्मांतराची वास्तविकता सभागृहात मांडावी. त्याही पुढे जाऊन काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांतील हिंदु आमदारांनी स्वतःच्या धर्माच्या बाजूने उभे रहावे, अशी अपेक्षा आहे. विरोधी पक्ष म्हणून या कायद्यामध्ये कोणत्या त्रुटी किंवा कमकुवत कलमे असल्यास त्यांवर अवश्य बोट ठेवावे आणि त्यामध्ये उचित पालट करण्यास सरकारला भाग पाडावे, असे समस्त हिंदु आमदारांकडून अपेक्षित आहे. महाराष्ट्रात मागील अनेक वर्षापासून 'धर्मांतरबंदी' कायद्याची मागणी होत आहे. त्याची कारणेही तशीच आहेत. मागील काही वर्षांत महाराष्ट्रात लव्ह जिहादची अनेक प्रकरणे पुढे आली. यामागे मूळ हेतू हिंदु युवतींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे धर्मांतर करणे हा होता. यासाठी मुसलमान युवकांना पैसे पुरवले जात असल्याचे उघड झाल्याचे प्रकार पुढे आल्यानंतरही एखाद-दुसऱ्या प्रकरणांमध्ये फसवणुकीचा गुन्हा नोंद होत होता; परंतु अशा कलमाखाली नोंदवलेल्या गुन्ह्यांतून धर्मांतराचे प्रकार रोखता येतील, अशी स्थिती नाही. लव्ह जिहादच्या प्रकारणांमध्ये मुलगी जर सज्ञान असेल आणि स्वतःच्या इच्छेने परधर्मीय मुलासमवेत रहात असेल, तर त्याला कायद्याने रोखता येत नाही; परंतु युवतीची फसवणूक करून धर्मांतर करण्याच्या उद्देशाने असा प्रकार होत असल्याचे सिद्ध झाल्यास त्या विरोधात कायदा अस्तित्वात नसल्यामुळे कारवाईला मर्यादा येत होत्या. श्रद्धा वालकर हत्या प्रकरणात मुसलमान युवकाने तिला प्रेमाच्या जाळ्यात फसवले आणि त्यानंतर तिची हत्या केली. त्यामुळे हा प्रकार उघड झाला. अनेक हिंदु युवती आई-वडिलांना सोडून मुसलमान युवकांशी लग्न करतात; मात्र त्यानंतर त्यांचे खरे स्वरूप उघड झाल्यावर त्यांना परतीचा मार्ग उरत नाही. अनेक युवतींचे आयुष्य उद्धवस्त होते. या कायद्यामुळे हे प्रकार कितपत रोखले जातील, हे आता सांगता येणार नाही; मात्र काही प्रमाणात का होईना, प्रेमाच्या जाळ्यात फसवून धर्मांतर करणाऱ्यांना चाप बसेल आणि महत्त्वाचे म्हणजे या कायद्यामुळे अशा प्रकरणांमध्ये कठोर शिक्षेचे प्रावधान येईल. लव्ह जिहादच्या प्रकारणांप्रमाणे खिस्ती मिशनरीही हिंदूंचे धर्मांतर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. नुकताच रायगड जिल्ह्यातील शिरढोण गावामध्ये 'द पेन्टेकॉस्टल कन्व्हेक्शन ग्राऊंड' येथे ४ दिवसांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात स्थानिक धर्मांतरित हिंदूंचा सहभाग होता. अन्य धर्मातील शिकवणीने प्रभावित होऊन नव्हे, तर येशू असाध्य रोग बरे करेल, अशा खोट्या थापा मारून अनेकांना अशा कार्यक्रमाच्या ठिकाणी आणले जाते, गरीब नागरिकांना पैशांचे आमीष दाखवले जाते आणि यातूनच त्यांचे धर्मांतर केले जाते. पनवेलसारख्या हिंदूबहुल भागात काही अंतरावर चर्च उभी राहिली आहेत. सिंधी समाजाचे वास्तव्य असलेल्या ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथे तर इमारतींमध्ये क्रॉसचे बांधकाम करण्यात आले आहे. येथे केवळ हिंदु युवतींचे नव्हे, तर हिंदु युवकांचेही धर्मांतर झाल्याचे प्रकार आढळून आले आहेत. खिस्ती युवती हिंदु युवकांशी विवाह करून त्यांचे धर्मांतरकरत असल्याचे प्रकार उल्हासनगरमध्ये आढळून आले. स्वतःचा धर्म वाचवण्यासाठी पाकिस्तानमधून स्वतःचे घरदार सोडून आलेला हा सिंधी समाज येथे येऊन मात्र फसवणुकीने धर्मांतरित झाला. मागील काही वर्षांपासून सिंधी समाज स्वतःची परंपरा वाचवण्यासाठी उल्हासनगरमध्ये मोर्चे, आंदोलने करत आहे; परंतु हे रोखण्यासाठी सरकारकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नाही. धर्मांतर म्हणजे केवळ पूजापद्धत पालटणे एवढ्यापुरते मर्यादित नाही, तर धर्मांतर म्हणजे सा! 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर' ही धर्मांतराची नेमकी व्याख्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी सांगितली आहे. आतापर्यंत काँग्रेस सरकारने मुसलमानांच्या भयाने 'धर्मांतरबंदी' कायदा आणला नाही. भाजप-शिवसेना यांची सत्ता आल्यावर सरकारने हा कायदा करणे अपेक्षितच होते; परंतु कायदा करतांना त्याची भयावहता सभागृहात मांडणे आवश्यक आहे. यापूर्वीच्या पावसाळी अधिवेशनामध्ये महाराष्ट्रात शहरी नक्षलवाद रोखण्यासाठी 'महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा कायदा' करण्यात आला. या कायद्याच्या दृष्टीने अन्य राज्यांत बंदी घालण्यात आलेल्या कबीर कला मंचसारख्या संघटनांवर सरकारकडून कारवाई होईल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात तसे झाले नाही. राज्यात गोमाता आणि गोवंश हत्या बंदी कायदाही आहे; मात्र भ्रष्ट पोलीस यंत्रणेमुळे गोमातेच्या हत्येची प्रकरणे राज्यात मोठ्या प्रमाणात होत आहेत. त्याप्रमाणे 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६' कायदा हा धर्मांतर रोखण्यासाठीचे एक सक्षम पाऊल आहे; परंतु हा कायदा राबवणारी यंत्रणाही प्रामाणिक असणे आवश्यक आहे. त्यामुळे कायदा करतांना तो सक्षमपणे राबवणारी यंत्रणा निर्माण करण्यावरही भविष्यात भर द्यावा लागणार आहे.

## खामेनींसाठी दुखवटा की शक्तिप्रदर्शन!



इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अमेरिका आणि इस्त्रायल यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर भारतामध्ये त्यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी आणि अमेरिका-इस्त्रायलचा निषेध करण्यासाठी ठिकठिकाणी मुस्लीम धर्मियांचे मोर्चे निघाले. काश्मीरमध्ये याला हिंसक वळण लागले. सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करण्यात आली. पाकिस्तानातही असेच आक्रमक निषेध मोर्चे निघाले, त्यावेळी आंदोलकांनी अमेरिकेच्या वकिलातीत घुसून तोडफोड करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिथे तैनात असलेल्या अमेरिकी सैनिकांनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यात आठ आंदोलक ठार झाले. खामेनी हे इराणचे जसे नेते होते, तसेच ते मुसलमानांच्या शिया पंथीयांचे धार्मिक प्रमुख होते. त्यामुळे त्यांना मानणारे जगभरात जे मुसलमान आहेत, त्यांनी काही ठिकाणी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. पण खामेनी यांचे धार्मिक नेते पद ही बाब सोडली तरी त्यांनी इराणची सत्ता हाती घेतल्यावर इराणमध्ये जे काही धार्मिक कट्टरवादी नियम लागू केले, त्यामुळे नागरिकांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आली. विशेषतः महिलांचे व्यक्तिस्वातंत्र्य पार पायदळी तुडविले गेले. त्यामुळे खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर आता तरी आपल्याला व्यक्तिस्वातंत्र्य मिळेल, मोकळेपणाने वावरता येईल, असे तिथल्या नागरिकांना वाटू लागल्याने त्यांनी नाचून गाऊन आनंद व्यक्त केला. अमेरिका आणि इस्त्रायलच्या इराणवर होत असलेल्या हल्ल्याचे इराणमधील नागरिकांना दुःख तर आहेच, कारण त्यामुळे त्या देशाचे नुकसान होत आहे, नागरिक मारले जात आहेत, पण त्याच वेळी धर्माच्या नावाने आपले अधिकार हिरावून घेणारे खामेनी गेले, याचाही त्यांना आनंद आहे. खामेनी हे शिया पंथीय होते. तसे पाहू गेल्यास इराण हा शिया पंथीयबहुल देश आहे. पण त्याच आखातात इराणच्या भोवती असलेले काही मुस्लीम देश हे सुन्नी पंथीय आहेत. त्यामुळे जरी आखातात मुस्लीम देश असले तरी त्यांच्या शिया आणि सुन्नी या पंथभेदामुळे वाद आहेत. यातील काही देशांनी शिया पंथीयांचे प्रमुख म्हणून खामेनी यांच्याविरोधात अमेरिका आणि इस्त्रायलला मदत केलेली होती, असे मानले जाते.

पॅलेस्टाईन आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धात पॅलेस्टाईनमधील नागरिकांचे मोठ्या संख्येने बळी जात आहेत. युद्धामुळे अनेकांची उपासमार होत आहे. महिला-मुलांचे प्रचंड हाल होत आहेत, जगात अशा प्रकारे कुणाचे बळी जातात, हाल होतात तेव्हा त्याचा निषेधच करायला हवा, याबद्दल प्रश्नच नाही. जगातील कुठलाही सहृदयी माणूस अशा घटनांचा निषेधच करेलच. भारताने पॅलेस्टाईन आणि इस्त्रायलचे युद्ध थांबावे आणि त्या भागात शांतता प्रस्थापित व्हावी, अशीच अपेक्षा व्यक्त केलेली आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धामुळे युक्रेनचे अतोनात नुकसान झालेले आहे. इतकेच नव्हे तर हे मोठे देश असल्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थांचे नुकसान होते. युद्धांमुळे खरे तर कुणाचाच फायदा होत नाही, तरीही देशांमध्ये युद्धे होतात, माणसांमध्ये संघर्ष होतात, हाणामाऱ्या होतात. त्याला काही कारणे असतात, ती देशांशी आणि व्यक्तींशी संबंधित असतात. अयातुल्ला खोमेनी यांची हत्या झाल्यानंतर भारतातील मुस्लिमांनी ठिकठिकाणी मोठे मोर्चे काढले. त्यामुळे अनेकांना त्याचे आश्चर्य वाटले. अनेकांच्या मनात हाच प्रश्न निर्माण झाला की, इराण हा एक वेगळा देश आहे. तिथल्या प्रमुख नेत्याचा मृत्यू झाला, तर इथला मुसलमानांनी आपल्यातील शिया सुन्नी असा भेद विसरून इतक्या मोठ्या संख्येने मोर्चे काढण्याचे काय कारण आहे? मोर्चामध्ये सहभागी झालेल्या काहींनी तर अतिशय तीव्र भावना व्यक्त केल्या. ते मुस्लीम धार्मिक नेते आहेत, त्यामुळे आम्ही त्यांच्याविषयी दुःख व्यक्त केले, अशी त्यांची भावना होती, पण हे करत असताना आपण भारतीय समाजापासून वेगळे उठून दिसत नाही ना याचा विचारही त्यांच्या मनात आला नाही.

2014 साली नरेंद्र मोदी पंतप्रधान होऊन भाजपची बहुमताची सत्ता केंद्रात आल्यापासून मुस्लीम समाजामध्ये बरीच नाराजी आहे, ती ते विविध प्रसंगी व्यक्त करत असतात. आपल्या सरकारने कितीही सुविधा दिल्यातरी विशिष्ट समाज आपल्याला मते देणार नाही, हे आता भाजप आणि मोदी यांनाही कळून चुकलेले आहे. त्यातून मग हिंदूंच्या मतांचे ध्रुवीकरण करून ती आपल्याकडे वळवण्यासाठी एक है तो सेफ है, अशा घोषणा भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांकडून दिल्या जातात. जणूकाही मुस्लीम समाज हा इथला नागरिकच नाही. संपूर्ण देशाच्या एकतेसाठी अशी भावना निर्माण होणे हिताचे नाही. त्यामुळे समाज विभागला जातो. जेव्हा समाज विभागला जातो, तेव्हा देश विभागला जातो. त्याचा अनुभव भारतीयांनी 1947 साली घेतलेला आहे. त्यामुळे भारतात राहताना आपल्याबद्दल इतर समाजामध्ये शंका निर्माण होणार नाही, याची आपण काळजी घ्यायला हवी. बरेच वेळा बाहेरच्या घटनेचे निमित्त असले तरी कारण आतले असते, आतली खदखद असते. त्यामुळे खामेनींच्या मृत्यूचे निमित्त असले तरी मुस्लिमांच्या मनात भाजपविरोधाची ही खदखद तर नाही ना, असाही प्रश्न उपस्थित होतो. कारण जेव्हा यापूर्वी भाजपने पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांना परत पाठवण्याचा कायदा केला तेव्हा मुस्लिमांनी देशात विविध ठिकाणी शाहिन बाग आंदोलन चालवले. भारताची फाळणी झाल्यावर जे मुसलमान भारतात राहिले त्यांनी आम्ही इथे मिळून मिसळून राहू असे सांगितले होते. आता आपल्या भूमिकेमुळे इतरांच्या मनात शंका निर्माण होणार नाही याची त्यांनी काळजी घ्यायला हवी. कारण शक्तिप्रदर्शन हे एक दोन दिवसांसाठी जोश निर्माण करणारे असते, पण देश म्हणून एकत्र राहताना त्याचे दूरगामी दुष्परिणाम होत असतात.

## आणखी एक 'क्लीन चिट'



**या निकालानंतर मुंडे यांच्या समर्थकांनी दमानिया यांना आक्षेपार्ह 'ट्रोल'केले; मात्र राजकीय विजनवासात जाऊन तोंड पोळून घेतलेले मुंडे यांनी समर्थकांना संयमाचा सल्ला दिला आहे.**

कृषी साहित्यखरेदी गैरव्यवहार आणि लाभाचे पद अशा प्रकरणांमधून मुंबई उच्च न्यायालयापाठोपाठ लोकायुक्तांकडूनही 'क्लीन चिट' मिळाल्याने माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांना दिलासा मिळाला; त्यापाठोपाठ मुंडे यांचे मंत्रिमंडळात पुनरागमन होण्याबाबतच्या चर्चा राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटात पुन्हा रंगू लागणे साहजिक आहे.

मुंडे हे राज्याचे कृषिमंत्री असताना कापूस, सोयाबीन व तेलबिया उत्पादकता वाढ विशेष कृती कार्यक्रमाअंतर्गत साहित्यखरेदीत शेकडो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप होते. त्याबरोबरच मुंडे व त्यांच्या पत्नीच्या कंपनीला 'महाजेनको' कडून राखखरेदी प्रकरणात लाभ झाल्याचाही आरोप होता. याच विषयावरील याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्या होत्या; त्याविरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी लोकायुक्तांकडे दाद मागितली. मात्र, उच्च न्यायालयाचा निकाल स्वयंस्पष्ट असून, त्याविरोधात लोकायुक्तांकडे नव्हे, तर सर्वोच्च न्यायालयात धाव घेता येते, असे सांगून लोकायुक्तांनी मुंडे यांच्याविरोधातील आरोप फेटाळले. त्यामुळे लोकायुक्तांचा निकाल हा तांत्रिक मुद्द्यांवर आधारलेला असून, सर्वोच्च न्यायालयातही जाण्याचा इशारा दमानिया यांनी दिला आहे.

गेल्या काही दिवसांमध्ये दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना राज्य बँक घोटाळा प्रकरणात क्लीन चिट मिळाली; त्यांचे चिरंजीव पार्थ पवार यांनाही पुण्यातील जमीनखरेदी अनियमिततेच्या आरोपांतून क्लीन चिट मिळाली, त्यापाठोपाठ मुंडे यांनाही दिलासा मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांचे ग्रह सध्या उच्च स्थानात दिसत आहेत. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी निकटवर्तीयांच्या सहभागामुळे राजीनामा द्यावा लागल्यानंतर मुंडे हे पुन्हा कोट शिवून तयार असल्याचे बोलले जाते. 'आपल्याला काही काम द्या,' अशी जाहीर विनवणी त्यांनी पूर्वीच केली होती.

माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याच्या काळात मुंडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचीही भेट घेतली होती; तसेच हल्ली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वजन वाढलेले प्रफुल्ल पटेल यांनीही मुंडेंच्या पुनरागमनाचे संकेत दिले होते. आता मंत्रालयातील लाच प्रकरणामुळे त्याच पक्षाचे मंत्री नरहरी झिरवळ अडचणीत आहेत. त्याबाबत काही घडामोडी घडल्याच, तर तयारीत असावे, असा कोणाचा मनसुबा असू शकतो. मात्र, अन्य आरोपांची तड लागेपर्यंत मुंडे यांची 'वापसी' होणार का, हा प्रश्नच आहे.

## स्त्री बीजाचा बाजार

आज आंतरराष्ट्रीय महिला दिन. समान हक्क, समान संधी आणि समान सन्मान या दिशेने विचार करण्याचा महत्त्वाचा दिवस. काही दिवसांपूर्वी बदलापूर येथे स्त्री बीजाच्या तस्करीचे प्रकरण उघडकीस आले. परंतु, यामध्ये तस्करी करणाऱ्या चार महिलांना अटक होण्यापलीकडे काहीही घडले नाही. दोन कोटी लोकसंख्या असलेल्या आणि त्यापैकी निम्म्या महिला असलेल्या राज्याच्या राजधानीत आणि महिलांसाठी काम करणाऱ्या शेकडो संस्था असणाऱ्या या महानगरात या तस्करी प्रकरणाच्या विरोधात अद्याप कोणीही आवाज उठवलेला नाही. ही घटना स्त्री सक्षमीकरणाच्या विरोधातली आहे, स्त्रियांचे शोषण करणारी आहे.

या तस्करी प्रकरणाची पाळेमुळे खणून काढली पाहिजेत आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करून होणारे हे भयंकर शोषण आणि कोट्यवधी रुपयांचा हा धंदा उघडकीस आणला पाहिजे, असे कोणालाच वाटले नाही, ही शोकांतिका आहे. समाज माध्यमांवर छोट्या मोठ्या गोष्टींवरती आपली मते व्यक्त करणारे आणि लाखोंच्या संख्येने कधी 'लाईक' तर कधी 'ट्रोल' करणारे तथाकथित जागरूक नागरिक अशा वेळेला कुठे गायब होतात, असा प्रश्न पडतो. हे संपूर्ण प्रकरण 'एआरटी' म्हणजेच सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) कायदा- २०२१ म्हणजेच 'असिस्टेड रिप्रॉडक्टिव्ह टेक्नॉलॉजी रेग्युलेशन ॲक्ट २०२१' या कायद्याखाली येते. हा भारत सरकारने ४२ नंबरचा १८ डिसेंबर २०२१ रोजी मंजूर केलेला कायदा आहे. याच दरम्यान सरोगसी (नियमन) करणारा कायदा २०२१ देखील मंजूर करण्यात आला. म्हणजेच चार वर्षांपूर्वी हा कायदा अस्तित्वात आला. भारतात अशा तंत्रज्ञानाचा वापर करून पहिली टेस्ट ट्यूब बेबी १९८१ साली जन्माला आली.

'आयसीएमआर'च्या मार्गदर्शक सूचना सोडल्यास २०२१चा कायदा येईपर्यंत हे नवीन तंत्रज्ञान नियमन करणारा कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता. महाराष्ट्राने २०१८मध्ये या नवीन तंत्रज्ञानाच्या नियमानाच्या संदर्भात एक राज्यस्तरीय तज्ञांची समिती स्थापन केली. कारण याच दरम्यान एका मोठ्या सिनेनटाने या तंत्रज्ञानाचा वापर करून सरोगसी केली. त्या बाळाच्या जन्माच्या आधीच त्याचे लिंग त्यांना माहीत असल्याची बातमी एका वृत्तपत्रात झळकली होती. आम्ही याबाबत खासगी फौजदारी गुन्हा दाखल केला होता. आम्ही दिलेल्या नोटिशीनंतर महाराष्ट्र सरकारने अभ्यास समिती स्थापन केली. त्यांनी सरोगसी आणि एआरटीसंदर्भात स्वतंत्र कायद्याची गरज असल्याचे नोंदविले. यासंदर्भात महाराष्ट्राच्या बाल हक्क संरक्षण आयोगाकडे असलेल्या एका महत्त्वपूर्ण प्रकरणात बालहक्क आयोगाने या सगळ्या प्रकरणाबाबत एका प्रसिद्ध रुग्णालयावर ठपका ठेवून तेथील तंत्रज्ञानाचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशा सूचना आरोग्य विभागाला दिल्या होत्या.

गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहता मुंबई ही या कायद्याच्या गैरवापराची राजधानी आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. या कायद्यात सहा प्रकरणे असून ४६ कलमे आणि १९ नियम आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे २४ विहित नमुने या कायद्यामध्ये अंमलबजावणीच्या दरम्यान वापरायचे आहेत. या कायद्यानुसार राज्यस्तरीय समिती केंद्र सरकार बरोबरीनेच नेमणे अनिवार्य आहे. सध्याच्या महाराष्ट्राच्या समितीचा कार्यकाल ५ ऑक्टोबर २०२६ मध्ये पूर्ण होत आहे. या कायद्याचे उल्लंघन करणारे रॅकेट बदलापूरमध्ये उघडकीस येऊनही समितीने याबाबत कोणतीही कारवाई किंवा आपली भूमिका जाहीर केलेली नाही. या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारने राजपत्रित आदेशाने समुचित प्राधिकारी नेमले आहेत.

राज्यातील सर्व सिव्हिल सर्जन आणि महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी हे या कायद्यांतर्गत समुचित प्राधिकारी आहेत. राज्यातील सर्व एआरटी क्लिनिक्स म्हणजेच तंत्रज्ञानाची सेवा देणारे सर्व दवाखाने, जे आयव्हीएफ सेंटर्स किंवा वंध्यत्व निवारण केंद्र म्हणून काम करतात, त्यांची तज्ज्ञता आणि वैधता तपासून नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसेच ज्या ठिकाणी स्त्री बीज आणि पुरुष बीज विशिष्ट तापमानामध्ये साठवून ठेवून योग्य वेळी वापरण्यास दिली जातात, अशा सेंटर्सना 'एआरटी बँक' म्हटले जाते. याचीही तज्ञता आणि वैधता तपासून त्याची नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. या कायद्यांतर्गत किती सेंटर नोंदवलेली आहेत. याची माहिती उपलब्ध नाही. परंतु, सगळ्यांत जास्त मुंबई ५४६, पुणे विभागात २०२, नागपूर विभागात ६९ आणि नाशिक विभागात ५५ अशी ११९९ फर्टिलिटी आणि आयव्हीएफ सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. या व्यतिरिक्त एवढीच संख्या नोंदणी नसणाऱ्या सेंटरची असू शकेल, हे जाहिराती बघता स्पष्ट दिसते.

एआरटी कायद्यानुसार विवाहित स्त्री- पुरुषाने, ज्यांना एक तरी मूल आहे आणि ज्यांच्या आयुष्यात फक्त एकदाच, म्हणजेच स्त्रीला २५ ते ३५ वयोमर्यादेत एका वेळेला सात स्त्रीबीजं देणगी म्हणून द्यावयाची आहेत आणि पुरुषांनी आयुष्यात फक्त एकदाच वय २१ ते ५५ या वयोमर्यादेत पुरुषबीज म्हणजे (सिमेन) देणगी रूपाने द्यायचे आहे. त्यापासून निर्माण झालेला गर्भ कोणत्याही प्रकारे भारतात किंवा भारताबाहेर विक्रीस कायद्याच्या कलम २९ प्रमाणे प्रतिबंधित केलेला आहे. या कायद्याचे कोणतेही कलम किंवा नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्तीस पहिल्या वेळेस पाच लाखापासून दहा लाखापर्यंत दंड भरावा लागेल. दुसऱ्या वेळेस असाच गुन्हा करताना आढळल्यास तीन ते आठ वर्षांपर्यंत सक्तमजुरीची शिक्षा आणि २० लाखांपर्यंतचा दंड भरावा लागेल. सदर कायद्याखाली सर्व गुन्हे फौजदारी दंड संहिता १९७३नुसार दखलपात्र गुन्हा आहे. कोणत्याही प्रकारे याचे व्यापारीकरण करणे किंवा त्याची गोपनीयतेचा भंग करणे हा सदर कायद्यानुसार गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे.

कलम २६नुसार सदर तंत्रज्ञानाचा वापर करताना पंधराहून अधिक वेगवेगळ्या टप्प्यांवर पुरुषबीज आणि स्त्री बीजाचा संयोग करून प्रयोगशाळेत घडविताना 'एक्स' 'एक्स' गुणसुत्रे डावलून 'एक्स' 'वाय'ची निवड करून मुलगाच जन्माला घालणे शक्य असल्यामुळे अशा प्रकारच्या लिंग निवडीलाही एआरटी कायद्यानुसार प्रतिबंध करण्यात आला आहे. एआरटी तंत्रज्ञान हे विज्ञानाला गवसलेले

**बदलापूरमध्ये उघडकीस आलेल्या स्त्रीबीज विक्री प्रकरणाचे धागेदोरे देशभरातील महत्त्वाच्या शहरांपर्यंत पोहोचलेले दिसतात. गरजू महिलांना कल्पना न देता त्यांच्या आरोग्याशी दीर्घकाळ हा खेळ सुरू होता. महिलांच्या शोषणाचे हे विषारी बीज उखडण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलावीत.**



वरदान म्हणून गरजू जोडप्यांना बाळ मिळवण्यासाठी म्हणजेच पालक म्हणून आपल्या आयुष्यातील आनंद घेण्यासाठी मदत करणारा हा कायदा बनवला आहे. परंतु, महाराष्ट्रासह देशामध्ये गरीब, गरजू, अल्पसंख्याक आणि मागास जनजातीतील स्त्रियांच्या प्रजनन आरोग्याबरोबरच जीवघेणा खेळ करीत स्त्री-बीज आणि पुरुष बीजाची मोठी तस्करी मुंबईसह देशभरातील अनेक महानगरं आणि जिल्ह्यांच्या ठिकाणी चालणाऱ्या या आयव्हीएफ सेंटर आणि वंध्यत्व निवारण केंद्राद्वारे होत आहे. यासाठी पीआरओ नेमलेले आहेत. मोठमोठ्या अपार्टमेंटस्मध्ये फ्लॅट्स घेऊन असे प्रकार सर्रास सुरू आहेत, हे नुकत्याच उघड झालेल्या प्रकरणात दिसले.

गरजूंकडून जेमतेम २५ हजारांत खरेदी केलेले स्त्री बीज किंवा पुरुष बीज लाखो रुपये घेऊन विकले जात आहेत. देणगी देणारा आणि देणगी स्वीकारणारा, तंत्रज्ञानाचा गैरवापर करणारा या सगळ्यांच्या संगनमताने सुरू असणाऱ्या या कोट्यवधी रुपयांच्या तंत्रज्ञानाच्या धंद्याकडे शासन स्तरावर डोळेझाक करण्यासाठी अर्थपूर्ण तडजोडी केल्या जात आहेत. आणि म्हणूनच अशा तंत्रज्ञानाच्या नियमनासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीवर राजकीय पक्षांचा वरदहस्त असणाऱ्या अशासकीय सदस्यांना आणि अधिकाऱ्यांना नेमले जाते. कायदा झाल्यामुळे व्यवस्थेला शिस्त लागण्याऐवजी व्यवस्था अबाधित चालू राहण्यासाठी कोट्यवधी रुपयांची उलाढाल मात्र सुरू राहिली आहे. महिला दिनाच्या निमित्ताने तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता स्त्रियांमध्ये वाढण्याऐवजी तंत्रज्ञान स्त्रियांचे शोषण करण्यासाठी आक्राळ विक्राळ स्वरूप घेत आहे, याची भीती वाटते. हे रोखण्यासाठी राजकीय शक्ती असणारी स्त्रियांची चळवळ निस्तेज होताना दिसते, याचे दुःख आहे.

### कारवाई का नाही?

बदलापूर येथील स्त्रीबीजाच्या तस्करीचे प्रकरण लक्षात आल्यानंतर फक्त चार महिलांना अटक करण्यात आली. या स्त्री बीजांचा ज्या ठिकाणी बाजार मांडला जात होता, तिथल्या आरव्हीएफ क्लिनिकवर किंवा एआरटी बँकेवर अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही. संबंधित अधिकाऱ्यांशी 'लेक लाडकी अभियाना'ची पदाधिकारी म्हणून चर्चा केली असता उडवाउडवीची उत्तरे मिळाली म्हणून आझाद मैदान पोलिस ठाण्याला पत्र देऊन आम्ही शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ रोजी धरणे आंदोलनाला बसलो. शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलवावे म्हणून मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री किंवा आरोग्य सचिव यांची भेट मागितली. निवेदन पाठवून पूर्ण दिवस आझाद मैदानावर 'लेक लाडकी' अभियानाचे कार्यकर्ते बसले, पण अधिवेशन सुरू असूनही शिष्टमंडळाला चर्चेस बोलवले गेले नाही. फौजदारी गुन्ह्यांच्या संदर्भामध्ये शेवटच्या कडीपर्यंत थेट छापे मारून गुन्हे दाखल करणे दखलपात्र फौजदारी गुन्ह्यांमध्ये अपेक्षित असते, कारण साक्षीपुरावे नष्ट होण्याची भीती असते. इथे गुन्हेगारांचीच नाव लपवून ठेवून फक्त छापे पडल्याच्या बातम्या दिल्या गेल्या. मुख्य गुन्हेगारांना अटक करण्यात आली नाही किंवा संबंधितांची नावेही जाहीर करण्यात आली नाहीत. २०२३ पासून एआरटी समिती अस्तित्वात असूनही एवढ्या मोठ्या रॅकेटचा धंदा खुद्द महाराष्ट्राच्या राजधानीत खुलेआम सुरू होता.

अटक केलेल्या चार महिला म्हणजे फक्त हिमनगाचे टोक आहेत. यासंदर्भात नुकताच महाराष्ट्राच्या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केला असता 'कडक कारवाई करण्यात येईल', असे उत्तर दिले गेले. प्रत्यक्षात त्यानंतरही तातडीने काही घडलेले दिसत नाही. यासंदर्भात आम्ही पाठपुरावा करणारच आहोतच. आंदोलनासह वेळ पडल्यास न्यायालयात जाण्याचा मार्गही आहेच. फौजदारी स्वरूपाचा गुन्हा असताना एसआयटी नेमा, असे म्हणणे म्हणजे साप म्हणून भुई बडवण्यासारखे आहे. कारवाईमध्ये कुचराई करणाऱ्या समुचित प्राधिकार्यांविरुद्धही कारवाई करण्याची गरज आहे आणि ज्यांना कायदा चालवण्यापेक्षा अर्थपूर्ण तडजोडी करण्यामध्ये रस आहे, अशांची राज्यस्तरावरील समितीतून हकालपट्टी करण्यात यावी, तरच कायद्याची जरब बसेल. आता महाराष्ट्र शासनाने अंमलबजावणीच्या संदर्भामध्ये राज्यपातळीवर मोहीम चालवावी आणि बेकायदा जाहिरात करून एआरटी आणि सरोगसीच्या कायद्याच्याबरोबर खेळ करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करून राज्यामध्ये कायद्याचे राज्य आहे हे दाखवून द्यावे.

### किचकट दत्तक प्रक्रिया

थेट याच विषयाशी संबंधित नसला तरी आणखी एका गोष्टीकडे सर्वांचे लक्ष वेधणे महत्त्वाचे आहे. अनेक जोडप्यांना मूल दत्तक घेण्याची इच्छा आहे. मात्र दत्तक प्रक्रिया अतिशय किचकट करण्यात आली आहे. एका बाजूला अनाथ बालके आई-बाबांची वाट बघत असतात आणि दुसऱ्या बाजूला मूल दत्तक घेण्यासाठी जोडपी धडपडत असतात. त्यांचे वय निघून जाते आणि निराश होऊन प्रयत्न सोडून द्यावे लागतात. या विरोधातही आवाज उठवणे फार गरजेचे झालं आहे.

### नेमके प्रकरण...

कृत्रिम वंध्यत्व निवारणाच्या वैद्यकीय उपचारपद्धतीमध्ये आयव्हीएफ केंद्रामध्ये वैद्यकीय उपचार दिले जातात. या प्रक्रियेमध्ये स्त्रीबीजाची गरज असेल तर ते सरकारने निर्धारित केलेल्या कडक निकषांचे पालन करून दात्या महिलांकडून घेणे अपेक्षित आहे. बदलापूर येथे मात्र स्त्रीबीज विक्रीचा अवैध बाजार सुरू होता. हे रॅकेट एका चक्क एका घरातून चालवले जात होते. एका महिलेने स्त्रीबीजे वाढवणारी हार्मोन्सची इंजेक्शन बेकायदा साठवून ठेवली होती. आर्थिकदृष्ट्या नाडलेल्या, गरजू महिलांना पैशाचे आमिष दाखवून ही इंजेक्शने दिली जात होती. स्त्रीबीजाची वाढ झाल्यावर संबधित महिलांना आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवले जात होते. तिथे ही स्त्रीबीजे काढून ती साठवली जात असल्याची आणि 'ग्राहकांना' विकली जात असल्याची शक्यता आहे. या प्रकरणाची पाळेमुळे ही केवळ बदलापूरमध्ये नसून ती राज्यात व राज्याबाहेरही पसरल्याचे दिसते. नाशिक येथील आयव्हीएफ आणि एआरटी सेंटरचाही सहभाग यात होता. पोलिसांनी या प्रकरणात धडक कारवाई केल्यानंतर असलेल्या परवान्याचा गैरवापर करत नाशिकच्या डॉ. अमोल पाटीलने ठाणे येथेही आयव्हीएफ सेंटर एका ब्लॉकमध्ये उघडून तिथेही अवैध कारभार सुरू ठेवला होता.

**पालकांमध्ये आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याची क्रेझ काही वर्षांपासून अनेक पटीने वाढली आहे. काही पालक आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याच्या बहाण्याने स्वत:ही स्वीमिंग शिकतात. अनेक तज्ज्ञ स्वीमिंगला एका खेळाव्यतिरिक्त व्यायामाचा एक उत्तम पर्याय मानतात. परंतु स्वीमिंग योग्यप्रकारे न केल्यास आरोग्यासाठी नुकसानकारकही ठरू शकते. इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयाचे डिपार्टमेंट ऑफ इंटरनल मेडिसिन सीनियर कन्सलटेंट डॉ. राकेश गुप्ता यांनी याबाबत काही टिप्स दिल्या आहेत.**

# सावधान! मुलांना स्वीमिंग शिकवण्याआधी घ्या ही काळजी

### आरोग्य तपासणी

मुलांना स्वीमिंगच्या क्लासला पाठवण्याआधी डॉक्टरांकडून मुलाची तपासणी करून घ्या. त्वचेचे संक्रमण, डोळे, नाक, कान, घशाची तपासणी करून घ्या. स्वीमिंग पूलच्या पाण्यात क्लोरिनचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे सर्व इंद्रियांची योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते.

जर मुलाचे वजन अधिक जास्त किंवा अधिक कमी असल्यास अशा मुलांना डॉक्टरांकडून काही सल्ले देण्यात येतात. त्यामुळे मुलांना स्वीमिंगला टाकण्याआधी डॉक्टरांचा जरूर सल्ला घ्या.

### स्वीमिंग पूलची स्वच्छता

स्वीमिंग पूलच्या स्वच्छतेवर लक्ष देणे गरजेचे असते. दररोज पूलमध्ये अनेक लोक येत असतात. अशावेळी एखाद्याला त्वचारोग किंवा अन्य काही रोग असल्याचा त्याचा आपल्या मुलालाही धोका होऊ शकतो. त्यामुळे रोज स्वीमिंग पूलचे पाणी बदलले जाते का, स्वच्छ केले जाते का याची चौकशी करा. अनेकदा स्वीमिंग पूल खुल्या जागी असतात. त्यावर छप्पर नसल्यास स्वीमिंग पूलमध्ये पडणाऱ्या धूळ, पावसाचे पाणी तसेच इतर कचऱ्यामुळे संक्रमण होण्याचा धोका असतो.

### लाईफगार्ड

सर्व स्वीमिंग पूलमध्ये लाईफगार्ड असणे गरजेचे आहे. काही वेळा एखाद्या साधारण पोहणाऱ्या व्यक्तीला लाईफगार्ड म्हणून उभे केले जाते. अशा व्यक्तीकडे आपत्कालीन परिस्थितीत वाचवण्यासाठी कोणतेही प्रशिक्षण नसते. ज्यावेळी स्वीमिंगसाठी येणाऱ्यांची संख्या अधिक असते, त्यावेळी अधिक लाईफगार्ड असणे गरजेचे आहे.



### प्रथमोपचार सुविधा

सरकारी नियमांनुसार जलतरण तलावात प्रथमोपचार सुविधा आणि इतर सर्व प्राथमिक सुविधा असाव्या. या सुविधा स्वीमिंग पूलच्या जवळ असाव्यात. आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तीला प्रथम प्राथमिक मदत कक्षात नेणे आवश्यक आहे आणि आवश्यकतेनुसार प्राथमिक मदत दिली गेली पाहिजे.

**प्रशिक्षण आणि प्रशिक्षक**

**पाण्यात उडी मारण्याआधी मुलांना अनुभवी कोचद्वारे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. मुलांना पोहण्याचे शिकवण्यावेळी सुरक्षा उपकरणांचा वापर होणे गरजेचे आहे. ग्लासेस, फ्लोटर्स, इयर प्लग, कॅप इत्यादींचा वापर करणे गरजेचे आहे. फ्लोटरमध्ये छोटासाही होल असल्यास त्याची वेळीच दुरुस्ती केली गेली पाहिजे. फ्लोटर्स योग्य नसल्यास पाण्यात मुलांचे संतुलन बिघडण्याचा धोका असतो.**

### डिहायड्रेशन

पाण्यात पोहत असतानाही शरीरात डिहायड्रेशन होत असते. जास्त घाम येतो. त्यामुळे पाणी सोबत ठेवणे गरजेचे आहे.

# हराभरा कबाब

**साहित्य :** २ मोठे कप भरून मटारचे दाणे, १ मोठा उकडलेला बटाटा, ब्रेड क्रम्बस, आमचूर पावडर, मीठ व थोडीशी साखर, २ ते ३ हिरव्या मिरच्या, आले व लसूण.

**कृती :** सगळ्यात पहिले कढईमध्ये तेल घेऊन त्यात मटारचे दाणे टाकले. त्यामध्ये थोडी हळद, मीठ, हिरवी मिरची, आले, लसूण, जिरे जाडसर वाटलेले टाकले. १० ते १५ सेकंद वाफवले. नंतर त्यात आमचूर पावडर आणि साखर टाकले व २ मिनिटे परतून घेतले. त्यानंतर हे मिश्रण थोडे थंड झाल्यावर मिक्सरमध्ये जाडसर भरड काढली. मटारच्या जाडसर भरडमध्ये कुस्करलेला बटाटा ब्रेड क्रम्बस व तोडे चवीपुरते मीठ टाकले. मिश्रण एकत्र केल्यावर गोल टिक्की बनवून तळून घेतले.



# सोन्याने सजवा रेशमी केस



**फॅशनच्या** युगात भूतकाळातल्या गोष्टी आल्या तर त्यात काही नवल नाही. कारण राजा-महाराजांच्या काळात मोठ्या कलाकुसरतेने तयार करण्यात आलेले पेहराव, नक्षीदार दागिने आजच्या आधुनिक युगातील कारागिरांना आकर्षित करत असून, त्यात काही बदल करून एक वेगळी नक्षी तयार केली जाते व तीच बाजारात पुन्हा फॅशनच्या रूपाने येते.



त्यापेक्षा वेगळी गोष्ट म्हणजे राजा-महाराजांच्या काळात सोन्याच्या मुलाम्याने केस सजवले जात होते. त्याच नक्षीकडे आजचे कारागीर आकर्षित झालेले दिसतात. फॅशन म्हणजे जुन्या नव्याचे मिश्रणच म्हणता येईल. काळानुसार फॅशनमध्ये बदल झाले आहेत. मात्र त्याच्यामागे भूतकाळ लपला आहे. नव्याने बाजारात असलेल्या हेअर ज्वेलरीवर त्याचा प्रभाव दिसतो.

देवदास, जोधा अकबर, हम दिल दे चुके सनम, उमराव जान असे काही चित्रपट आहेत, की त्यात नायिकेच्या केसांवर





अधिक भर दिलेला दिसतो. भारतीय मुघल साम्राज्यातील शैली त्यात वापरलेली दिसते. या दागिन्यांना सामान्य नागरिकांनी देखील पसंती दर्शवली आहे. घागरा, साडी, सलवार-कुर्ता किंवा शर्ट पॅण्टवर देखील हे दागिने परिधान केले जाऊ शकतात. या दागिन्यांमध्ये हिरे, मोती, माणिक यांचे वर्क केले जात असल्याने त्यांच्या वजनानुसार त्यांची किंमत ठरवली जाते. रेश्मी केसांकरिता तयार करण्यात येणारे दागिने शुद्ध सोन्यात केले जातात. मात्र कमी बजेटमध्ये चांदीच्या दागिन्यांवर सोन्याची पॉलिश करून ते खरेदी करता येऊ शकतात.

# आल्याचा ज्यूस आरोग्यासाठी फायदेशीर



- आल्याच्या रसामुळे डायबेटिज कंट्रोल होण्यास मदत होते. यातील अँटी डायबेटिक गुणधर्मामुळे डायबेटिज नियंत्रित राहतो.
- पचनाचा त्रास असल्यास त्यावर आल्याचा रस उत्तम. आल्याच्या रसाने पचन नीट होते.
- कोलेस्ट्रॉल लेव्हल कमी होण्यासाठी आल्याचा रस घेणे फायदेशीर.
- आल्याच्या रसाच्या सेवनाने मुरुमे कमी होतात.
- कफाचा त्रास असल्यास त्यावरही आल्याचा रस उत्तम. पावसात सर्दी-खोकल्याचा त्रास अधिक होतो. त्यामुळे पावसात आल्याचा रस नियमितपणे घेतल्यास सर्दी-खोकल्यापासून बचाव होऊ शकतो.

# उन्हाळ्यात एसी चालवण्याआधी हे काम न केल्यास विजेचे बिल येईल भरमसाट

उन्हाळा सुरू झाला आहे. अनेक घरांत २४ तास पंखे सुरू ठेवावे लागत आहेत. तुमच्या घरात जर एसी असेल तर तो चालवण्याआधी काही गोष्टी जाणून घ्या. आज आम्ही तुम्हाला या ठिकाणी काही खास टिप्स देत आहोत. ज्या तुमच्या वीज बचत करण्यास मदत करू शकतात. तुम्ही जर या टिप्सचा वापर न करता एसी चालवत असाल तर तुमचे वीज बिल जास्त येण्याची शक्यता आहे. नेहमी लोक गरमीत एसी ऑन करतात. परंतु असे करणे चुकीचे आहे. गरमीत एसी सुरू करण्याआधी काही गोष्टी जाणून घेणे खूप गरजेचे आहे. जाणून घ्या डिटेल्स.

**घरात एसी असणारे अनेक लोक असे आहेत. जे वर्षभर एसी चालवत नाहीत. परंतु उन्हाळा सुरू झाला की, घरातील एसी अचानक सुरू करतात. परंतु त्याआधी काही गोष्टी जाणून घेत नाही. त्यामुळे महिन्याचे बिल जास्त येते.**



**एसी सर्व्हिस करणे आवश्यक**

काही महिन्यापासून बंद पडलेला एसी अचानक तुम्ही जर उन्हाळ्यात सुरू करीत असाल तर काही गोष्टी जाणून घ्यायला हव्यात. एसीला सुरू करण्याआधी त्या एसीची सर्व्हिस करणे खूप आवश्यक आहे. असे केल्याने केवळ गरमीत थंड हवा मिळत नाही तर वेळोवेळी सर्व्हिसिंग केल्याने तुमच्या एसीची लाइफसुद्धा वाढते. जर तुम्ही विना सर्व्हिस एसी सुरू ठेवत असाल तर तुमची खोली एसीने थंड होईल, पण महिन्याला विजेचे बिल भरमसाट येऊ शकते.

**एसी गॅस संबंधी हे काम करणे आवश्यक**

जितकी आवश्यक एसी सर्व्हिस आहे. तितकेच आवश्यक एअर कंडिशनरमधील गॅस चेक करणे आहे. उन्हाळा सुरू होण्याआधी विनागॅस चेक करता एसी सुरू केला तर होऊ शकते की, तासभर एसी चालवल्यानंतर तुम्हाला थंड एसी मिळणार नाही. कूलिंग कमी होऊ शकते. कारण कम्प्रेसरवर दबाव वाढतो. यामुळे तुमचा एसी खराब होऊ शकतो. तुम्हाला हा एसी दुरुस्त करण्यासाठी मोठी रक्कमसुद्धा मोजावी लागू शकते.

# वापरा नॅचरल टोनर

**चेहरा** ऑईली असेल तर घरगुती बनवलेल्या टोनरच्या सहाय्याने सुस्थितीत राखता येतो. तेलकट त्वचेसाठी काकडीपासून बनवलेले टोनर उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे टोमॅटोपासून बनवलेल्या टोनरच्या वापराने चेहऱ्याचा वर्ण उजळतो आणि मुरुमांची समस्या कमी होते. तुलसी टोनरही विशेष लाभकारक ठरते.

यासाठी तुळशीची पाने चुरडून उकळत्या पाण्यामध्ये सोडावीत. थंड झाल्यावर या पाण्यामध्ये एक चमचा कोरफडीचा गर मिसळावा. आता तयार मिश्रण बाटलीत भरून टोनरसारखे वापरावे, याच पद्धतीने मेथी घालून अथवा हळदीच्या सहाय्याने टोनर बनता येते. हळदीचे टोनर बनवताना एक चमचा लिंबाचा रस मिसळण्यास विसरू नये.



# पोटावरील चरबी कमी करण्यासाठी या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक

**एखाद्याच्या शारीरिक स्वास्थ्याचा अंदाज शरीराच्या सुदृढतेवरून लावला जातो. त्यामुळे बळकट आणि 'टोन्ड' स्नायू, उत्तम स्टॅमिना आणि अर्थातच न सुटलेले पोट यावरून एखाद्याच्या स्वास्थ्याचा अंदाज लावता येऊ शकतो. नियमित व्यायाम आणि संतुलित आहाराने शरीर सुदृढ आणि सुडौल होत असतानाच पोटावर असलेली चरबी कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान ठरू शकते. पोटावर साठलेली चरबी कमी करण्यासाठी प्रयत्न करत असलेल्यांमध्ये याबद्दल अनेक गैरसमजही पाहावयास मिळतात. हे गैरसमज कोणते आणि यामध्ये कितपत तथ्य आहे, हे जाणून घेऊ या.**



**व्यायामामध्ये** खास पोटावरील चरबी कमी करण्यासाठी केवळ 'क्रन्चेस' केल्याने चरबी कमी होते हा गैरसमज अनेकांच्या मनामध्ये असतो. क्रन्चेस हा व्यायाम प्रकार पोटावरील चरबी घटवण्यास सहाय्यक असला, तरी केवळ याच्यामुळे पोटाचा घेर कमी होतो असे मात्र नाही. क्रन्चेस करून पोटावरील चरबी कमी करतानाच, सर्व शरीरावरील चरबी कमी होईल अशा प्रकारचा व्यायाम केला जावा. त्यामुळे आपल्या व्यायामामध्ये 'स्ट्रेंग्थ ट्रेनिंग' आणि 'हाय इंटेन्सिटी कार्डियो'सारख्या व्यायाम प्रकारांचाही समावेश असावा.

कित्येकदा केवळ ग्रीन टीच्या सेवनाने पोटावरील चरबी घटण्यास मदत होत असल्याचा समजही अनेकांच्या मनामध्ये दिसून येतो. ग्रीन टीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मुबलक मात्रेमध्ये असल्याचे जरी खरे असले, तरी केवळ ग्रीन टी प्यायल्यानेच पोटावरील चरबी कमी होते असे समजणे चुकीचे आहे. पोटावरील चरबी कमी करण्यासाठी ग्रीन टीच्या जोडीनेच संतुलित, पौष्टिक आहार आणि योग्य व्यायामाचीही आवश्यकता असते. नियमित व्यायाम केल्याने आपल्या मनाला येईल ते आपण खाऊ-पिऊ शकतो अशी समजूत वजन आणि अर्थातच पोटावरील चरबी वाढण्यास कारणीभूत ठरत असते. योग्य आहार आणि नियमित व्यायाम हे एकमेकांना पूरक असून, यांच्यामधील योग्य संतुलन साधता आल्यानेच पोटावरील चरबी घटवता येणे शक्य होत असते.

बाजारामध्ये उपलब्ध असलेले तथाकथित 'लो फॅट', पॅकेज्ड अन्नपदार्थ वजन घटवण्यासाठी चांगला पर्याय असल्याचेही अनेक लोक मानतात. पण वास्तविक आहारामध्ये इतर सर्व पोषक तत्त्वांच्या सोबत स्निग्ध पदार्थदेखील आवश्यक असतात. त्यामुळे आहारातून शरीराला 'गुड फॅट्स' मिळतील असे अन्नपदार्थ आपल्या आहारामध्ये समाविष्ट असायला हवेत. शरीराला चांगले असे स्निग्ध पदार्थ आहारातून घेतले गेल्याने भूक लवकर शमण्यास मदत होत असते. त्यामुळे सातत्याने 'लो-फॅट' पदार्थांच्या सेवनाने शरीराला फायदा होण्याऐवजी नुकसान होण्याची शक्यताच जास्त असते. आपल्या आहारामध्ये तूप, चांगल्या प्रतीची खाद्यतेले यांचा समावेश अवश्य असावा. कमी खाल्ल्याने पोटावरील चरबी कमी होते असाही एक गैरसमज आढळून येत असतो. भोजन घेताना आपण किती खात आहोत याकडे लक्ष असणे अगत्याचे असले तरी आपली भूक मारणे किंवा नावापुरते काही तरी खाऊन अधिक काळ स्वत:ला उपाशी ठेवणे याचे अपायच अधिक आहेत.

आपल्या शरीराला आवश्यक तितका आहार मिळाला नाही, तर शरीराची चयापचय शक्ती कमी होते आणि त्यामुळे वजन घटण्याची प्रक्रियाही मंदावते. त्यामुळे माफक आहाराद्वारे शरीराला आवश्यक इतकी कर्बोदके, प्रथिने, क्षार, जीवनसत्त्वे आणि अन्य पोषक तत्त्वे मिळतील याकडे लक्ष देणे गरजेचे असते. याकामी गरज भासल्यास आहारतज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्यावा.

# गुणकारी दुधीभोपळा

**भोपळा ही अनेकांची नावडती भाजी, भरीत, कोशिंबीर, सूप असे पदार्थ भोपळ्यपासून बनवले जातात. कितीही नावडता असला तरी गुणधर्मामुळे थोड्या प्रमाणात का होईना, परंतु प्रत्येकाने भोपळा खायलाच हवा. चेहऱ्यावर पडणाऱ्या सुरकुत्यांपासून पोटाच्या गंभीर विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. भोपळ्याच्या अशाच काही औषधी गुणधर्माबाबत जाणून घेऊ.**

**भोपळ्यात 'बिटा करोटिन'**

- या घटकाचं प्रमाण बरंच जास्त असतं. यामुळे भोपळा हा 'अ' जीवनसत्त्वाचा समृद्ध स्त्रोत मानला गेलाय. बिटा केरोटिनमधील ऑंटिऑक्सिडंट्समुळे शरीरातील फ्री रेडिकल्सचा सामना अगदी सहज करता येतो.
- भोपळा हे तापावरचं औषध आहे.
- भोपळ्यातील विशिष्ट्य प्रकारच्या खनिजांमुळे मेंदूच्या नसांना आराम मिळतो.
- हृदयरोग्यांसाठी भोपळा वरदान मानला जातो. भोपळ्यात कोलेस्ट्रॉल कमी करण्याची क्षमता असते.
- आतड्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही भोपळा गुणकारी मानला जातो. भोपळ्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते.
- बहुसंख्य महिलांमध्ये लोहाची कमतरता आढळते. अशा महिलांनी भोपळ्याच्या बियांचं सेवन करावं. भोपळ्याच्या बियांमध्ये लोह, झिंक, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम यांचे प्रमाण भरपूर असल्याने बरेच लाभ होतात.
- पोटाच्या विविध विकारांवर भोपळा गुणकारी ठरू शकतो. यातील फायबरमुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट स्वच्छ झाल्याने अनेक रोगांना दूर ठेवता येतं.



# नखे अशी सांभाळा

**आपल्या शरीरातील कोणताही अवयव मग तो छोटा असो वा मोठा जोपर्यंत स्वस्थ असतो आणि त्याच्या कार्यात कुठेही बाधा येत नसते तोपर्यंत शरीरात कोणत्याही व्याधी निर्माण होत नसतात. मात्र काही वेळा अगदी बारीकसारीक दुखणीही कमालीची वेदनादायक ठरतात. आपल्या बहुतेक सर्व कामामध्ये हाताची बोटे आपण वापरत असतो. अनेक वेळा या बोटांच्या नखांना इजा होतात आणि त्यात पाणी जाऊन पू होतो आणि मग बोटांना ठणका लागतो. त्यावेळी हे उपाय करून पाहावेत.**



**नख दुभंगणे, जिव्हाळे लागणे**

ज्या बोटाला हा विकार असेल त्या बोटाला घट्ट चिकटपट्टी बांधावी. हा विकार अगदी थोडक्या काळासाठी असतो व बरेच वेळा १-२ दिवसांतच बरा होतो.

**नखुरडे**

बऱ्याच वेळा नखुरडे झाल्याने बोटाला ठणका लागतो. यातही बोटाला चिकटपट्टी घट्ट बांधल्यास नखुरडे लवकर फुटते. दुसरा उपाय म्हणजे शेंदूर व अंड्याचा पांढरा बलक खलून लावल्याने आराम पडतो. शेंदूर हा अँटीसेप्टीक म्हणून काम करतो.



**नखे वेळच्या वेळी कापणे**

हाताच्या बोटांची तसेच पायाच्या बोटांची नखे वेळच्या वेळी कापणे, त्यात अडकलेली घाण वेळच्या वेळी काढणे हे एकंदर आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. वय वाढत जाईल तसा नखांचा कडकपणा वाढत जातो. वृद्ध वयात तर नखे कापणेही अवघड जाते. अशावेळी पाण्यात बोरीक पावडर टाकून पाय थोडा वेळ बुडवून ठेवावेत व मग नेलकटरच्या सहाय्याने नखे कापावीत. अंघोळ झाल्यानंतरही नखे गरम पाण्यामुळे मऊ पडलेली असतात. त्यावेळी ती काढावीत. तसेच नखे कापताना अगदी त्वचेजवळ कापू नयेत. त्यामुळे जिव्हाळे लागण्याचा संभव कमी होतो.

**लहान बाळाची नखे कापतानाही**

अगदी लहान बाळाची नखे कापतानाही बाळाची अंघोळ होऊन बाळ झोपले की मगच ती अलगद काढावीत.

# सौंदर्यप्रसाधनं ठेवा फ्रीजमध्ये

**फ्रीजमध्ये नाशवंत पदार्थ ठेवले जातात. मात्र केवळ नाशवंत खाद्यपदार्थच फ्रीजमध्ये ठेवावेत असं नाही. लवकर खराब होणारी काही सौंदर्यप्रसाधनंदेखील फ्रीजमध्ये ठेवता येतील. फ्रीजमध्ये थंड वातावरणात प्रसाधनांमध्ये बॅक्टेरिया उत्पन्न होण्याचा धोका कमी होतो. त्याबरोबर प्रसाधनाचा रंग आणि आकार सुरक्षित राहतो. अशी कोणती प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत, जाणून घेऊया...**



- परफ्यूम नेहमी थंड आणि कोरड्या जागी ठेवायला पाहिजे म्हणूनच परफ्यूम ठेवण्यासाठी फ्रीज ही योग्य जागा आहे. या थंड वातावरणामुळे परफ्यूमचं शेल्फ लाईफ वाढतं.
- डोळ्याखालील काळी वर्तुळं घालवण्यासाठी आय क्रीम्स वापरली जातात. कोल्ड आय क्रीममुळे डोळ्याखालची सूज कमी होते त्याचप्रमाणे काळवंडलेपणा कमी होतो. आय क्रीम्स फ्रीजमध्ये ठेवावीत.
- उन्हाळ्यात लिपस्टिक विरघळते. मूळ आकार नाहीसा होतो. अशी विरघळलेली लिपस्टिक लावणं कठीण जातं. शिवाय उष्ण तापमानामुळे लिपस्टिकमधील रसायनांमध्ये बदल घडू शकतो. मूळ रंग हरवण्याचाही धोका असतो. हे सर्व टाळण्यासाठी उन्हाळ्यात लिपस्टिक फ्रीमध्ये ठेवावी.
- फेशियल मास्क ठेवण्यासाठीही फ्रीज ही उत्तम जागा आहे. बाहेरच्या तापमानात फेशियल मास्कमधील काही महत्त्वपूर्ण घटक नष्ट होऊ शकतात.
- सध्या ऑर्गेनिक मेकअपचा बोलबाला आहे. अत्यंत चांगले परिणाम मिळत असल्यामुळे ही प्रसाधनं महिलांच्या पसंतीत उतरत आहेत. मात्र ऑर्गेनिक किंवा होममेड प्रसाधनांमध्ये प्रिझर्व्हेटिव्ह नसतात. म्हणून ती लवकर खराब होतात. हे टाळण्यासाठी ऑर्गेनिक प्रसाधनं फ्रीजमध्ये स्टोअर करावीत.
- व्हिटॅमिन सी युक्त सर्व प्रसाधनं सक्रिय घटकांनी युक्त असतात. त्याचप्रमाणे प्रसाधनांमध्ये रेटिनॉल आणि पेप्टाईड असल्यास अधिक काळजी घ्यावी लागेल. उग्र तापमानात या रसायनांच्या संरचनेत बदल होऊ शकतो. म्हणूनच अशी प्रसाधनं फ्रीजमध्ये ठेवावीत.

**लग्नात बस्ता बांधायचा नाही**

महाडमधील वहूर उगवती वाडी या गावातील महिलांनी मात्र गावकीत निर्णय घेवून लग्न समारंभातील उधळपट्टीवर निर्बंध आणले आहेत. लग्नात बस्ता बांधायचा नाही, चिकन मटणाच्या जेवणावळी, दारूपाटर्या करायच्या नाहीत असा निर्णय या महिलांनी घेतला आहे. लग्न समारंभात वारेमाप खर्च करण्याचा निर्णय वैयक्तिक असला तरी यातून पैशाची मोठया प्रमाणावर नासाडी होत असते. आयुष्यात लग्न एकदाच होते या शब्दाच्या आडून भरजरी पोषाख, भव्य सजावट, प्री वेडींग शूट थीम वेडींग यात पैसा, वेळ आणि श्रमांचा अपव्यय होतोच पण पाण्यासारखा पैसा खर्च केल्याने कर्जबाजारीपणा वाढतो. अशावेळी वहूर उगवती वाडीतील महिलांनी घेतलेल्या निर्णयाचे परीसरात स्वागत होत आहे. लग्न समारंभात होणाऱ्या अनावश्यक खर्चावर विचामंथन होणे गरजेचे आहे.यासाठी सर्वांनी पुढं येणं जसं गरजेचं आहे तसंच याबाबत सामाजीक प्रबोधनदेखील आवश्यक आहे. वहुरच्या महिलांनी घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आणि अनुकरणीय आहे एवढं मात्र नक्की.

# रायगड जिल्ह्यातील कोणत्या गावात हळदी समारंभातील दारू, मटण बंद



## लग्न समारंभातील खर्चिक प्रथांना मूठमाती

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

लग्नकार्यावर होणारा वारेमाप खर्च टाळण्यासाठी महाडच्या वहूर उगवती वाडीतील महिलांनी पुढाकार घेतला आगे. लग्न कार्याच्या निमित्ताने होणाऱ्या खर्चिक प्रथांना मूठमाती देण्याच्या दृष्टीने महिलानी महत्वाचं पाऊल उचललं आहे. लग्नात पाहुणे, नातेवाईक यांच्यासाठी कपडे खरेदी म्हणजेच बस्ता बांधण्याची प्रथा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलाय. लग्नात हळदी समारंभात मटण, चिकन, दारू यावर देखील पैशांची उधळपट्टी होत. शिवाय यातून वादाचे प्रसंग घडतात आणि प्रसंगी तणावही निर्माण होतो, ज्यामुळं ही प्रथा देखील बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दोन व्यक्ती, कुटुंबं आणि संस्कृतींना जोडणारी एक कायदेशीर सामाजिक संस्था. जी प्रेम, भावनिक आधार आणि आणि भागीदारीवर आधारीत पवित्र बंधन मानले जाते. परंतु हे दोन जीव एकत्र येत असताना दोन्ही कुटुंब त्यावर अनावश्यक खर्च करत असतात. कधी खोटया प्रतिष्ठेपायी तर कधी समाजाच्या बंधनाखाली नाईलाजास्तव पैशांची उधळपटटी केली जाते. पै पाहुण्यांच्या मानपान ठेवण्यात, कपडालत्ता खरेदी करण्यात, जेवणावळी घालण्यात दोन्ही बाजूची मान अनेकदा खर्चाच्या ओज्याखाली दबण्याची वेळ येते.

# थकबाकी भरली नाही तर १६ मार्चपासून पाणीपुरवठा बंद

## जायकवाडी धरणाची ६४ कोटींची थकबाकी



■**संभाजीनगर। प्रतिनिधी,**

शहरातील पाणीप्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जायकवाडी प्रकल्पातून होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर आता टांगती तलवार आली असून ६४ कोटी ९७ लाख रुपयांची थकबाकी तातडीने भरा, अन्यथा १६ मार्चपासून शहराचा पाणीपुरवठा बंद करण्यात येईल, असा कडक इशारा पाटबंधारे विभागाने संभाजीनगर महापालिकेला दिला आहे. पैठण येथील जायकवाडी धरणातून छत्रपती संभाजीनगर शहराला पाणीपुरवठा केला जातो. या पाण्यासाठी महापालिकेला दरमहा पाटबंधारे विभागाकडे पाणीपट्टी जमा करावी लागते. मात्र, महापालिकेकडून ही रक्कम वेळेवर भरली जात नसल्याने थकबाकीचा आकडा तब्बल ६४ कोटी ९७ लाख ९६ हजार रुपयांवर पोहोचला आहे.

**लेखी नोटीस बजावली**

याच पार्श्वभूमीवर जायकवाडी प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांनी महापालिकेला लेखी नोटीस बजावत १५ मार्चपर्यंत संपूर्ण थकबाकी भरण्याचे आदेश दिले आहेत. अन्यथा १६ मार्चपासून शहराचा पाणीपुरवठा थांबवण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**महापालिकेकडून वसुली अत्यल्प**

महापालिकेने चालू आर्थिक वर्षात पाणीपट्टी वसुलीसाठी २५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवले आहे. यात सुमारे १०० कोटी रुपये थकबाकीचे आहेत. मात्र, १ एप्रिल ते २ मार्चदरम्यान मनपाला फक्त १८ कोटी ४५ लाख ५६ हजार ४९५ रुपयांचीच वसुली करता आली आहे. महापालिकेने काही वर्षांपूर्वी पाणीपट्टी ४ हजार रुपयांवरून कमी करून २ हजार ५० रुपये केली होती. तरीही नागरिकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने वसुली रखडली आहे. शहरात सध्या १ लाख २० हजार नळ कनेक्शन मनपाच्या नोंदीत आहेत.

**नागरिकांवर पाणीटंचाईचे संकट?**

पाटबंधारे विभागाच्या या नोटीसमुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये पाणीटंचाईचे मोठे संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आता महापालिका प्रशासन थकबाकी कशी भरते आणि पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी काय उपाययोजना करते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# धूळ नियंत्रण गाड्यांचा पाणी मारण्यासाठी वापर

■**विरार। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहरातील वाढत्या धूळ प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारच्या नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम अंतर्गत महानगरपालिकेला देण्यात आलेल्या अँटी-स्मॉग / वॉटर स्प्रिंकलर गाड्यांचा योग्य वापर होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर धूळ प्रदूषण असतानाही या गाड्या शहरातील झाडांना पाणी मारत असल्याचे समोर आले आहे. वसई-विरार महानगरपालिकेकडे एकूण पाच अँटी-स्मॉग गाड्या उपलब्ध आहेत. मात्र गेल्या सुमारे १५ दिवसांपासून त्यापैकी केवळ एकच गाडी कार्यरत असून उर्वरित चार गाड्या उभ्या ठेवण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. इंधन उपलब्ध नसल्यामुळे या गाड्या बंद ठेवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. शहरात विविध ठिकाणी सुरू असलेल्या खोदकामामुळे आणि रस्त्यांवरील धुळीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अशा परिस्थितीत धूळ नियंत्रणासाठी असलेल्या गाड्या बंद असल्याने हवेत धुळीचे प्रमाण वाढत असून त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. याशिवाय काही ठिकाणी या गाड्यांचा वापर रस्त्यांवरील धूळ नियंत्रणाऐवजी झाडांना पाणी देण्यासाठी टँकरप्रमाणे केला जात असल्याचेही निदर्शनास आले आहे. केंद्र सरकारच्या महत्त्वाच्या योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या साधनांचा अशा प्रकारे वापर होणे गंभीर असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाची महापौर व उपमहापौर यांनी तातडीने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात आणि सर्व अँटी-स्मॉग गाड्या तात्काळ सुरू करून शहरातील धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी वापराव्यात, अशी मागणी अॅड. सतीश अर्जुन भोंटते यांनी केली साहे.

# वसई-विरार शहरात 95 टपऱ्या 36 पत्राशेड 24 बांबू शेड जमीनदोस्त

■**वसई। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून अनधिकृत फेरीवाल्यांवर सलग दुसऱ्या दिवशीही कारवाई करण्यात आली. आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांच्या निदेर्शानुसार व अतिरिक्त आयुक्त दीपक सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली आहे.

शुक्रवारी (6 मार्च) प्रभाग समिती 'जी' वालीव अंतर्गत भोईदापाडा नाका व फादरवाडी नाका परिसरातील मुख्य रस्त्यांवर अनधिकृतपणे उभारलेल्या स्टॉल व टपऱ्यांवर जेसीबीच्या साहाय्याने तोडक कारवाई करण्यात आली. प्रभाग सहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईत 35 टपऱ्या, 24



पत्राशेड व 15 बांबू शेड हटविण्यात आले आहे. तसेच प्रभाग समिती 'बी' अंतर्गत राधाकृष्ण हॉटेल परिसर, नागिनदास पाडा, मोरेगाव, मनवेलपाडा तलाव व कारगिल नगर परिसरातही अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाईकरण्यात आली. प्रभाग सहाय्यक आयुक्त अलका खैरे यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमण विभागाने जेसीबीच्या मदतीने टपऱ्या व स्टॉल हटवून परिसर मोकळा केला. या कारवाईत 52 टपऱ्या, 12 हातगाड्या व 8 शेड निष्कासित करण्यात आले. याशिवाय प्रभाग समिती 'एच' नवघर- माणिकपूर अंतर्गत वसई पश्चिमेकडील वसई रेल्वे स्थानक परिसर व आनंद नगर मार्केट परिसरातील अनधिकृत फेरीवाल्यांवरही कारवाई करण्यात आली.

प्रभाग सहाय्यक आयुक्त हरेश्वर पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईत 8 टपऱ्या व 3 हातगाड्या हटविण्यात आल्या. अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्धची कारवाई पुढेही सुरू राहणार असून नागरिकांच्या ये-जा व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

# पंढरपुरात ट्रक चालकास मारहाण करणाऱ्या अन् 3000 घेणाऱ्या 2 वाहतूक पोलिसांचे निलंबन

■**पंढरपूर। प्रतिनिधी,**

पंढरपूर शहरात नो एंट्रीमध्ये घुसल्याचे कारण दाखवत ट्रक चालकाकडून ज्यादा पैसे घेत आणि त्याला मारहाण करतानाचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता या दोन वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तीन दिवसांपूर्वी शहरातील सांगोला चौकात एक ट्रक आल्यानंतर वाहतूक पोलिसांनी त्याच्याकडून 3000 रुपये घेत 1000 रुपयाची पावती दिल्याचा आरोप या ट्रक चालकाने केला होता. यानंतर पोलीस कर्मचाऱ्यांनी जाब विचारणाऱ्या या ट्रक चालकाला मारहाण केली होती. यावेळी वाहतूक कोंडी मध्ये अडकलेले शरद पवार गटाचे आमदार राजू खरे यांनी तातडीने पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. चालू विधानसभा अधिवेशनात आमदार खरे यांनी पंढरपूरच्या वाहतूक पोलिसांचा हा प्रकार उपस्थित केल्यानंतर आता या दोन पोलीस कर्मचाऱ्यांचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी तातडीने निलंबन केले आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

पंढरपूर शहरातील सांगोलाकडे जाणाऱ्या चौकात अवजड वाहतूक करणाऱ्या एक ट्रक चालकाला पोलिस बेदम असल्याचे व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला होता. या ट्रक चालकाने नो एन्ट्रीमध्ये वाहन आणल्याने पोलिसांनी दोन हजार रुपये घेतले तसेच घेतलेल्या रकमेची पावती दिली नाही, असा आरोप ट्रक चालकाने केला आहे. तसेच काही अंतर गेल्यावर चालकाच्या मोबाईल वर एक हजार रुपये दंड आल्याचा मेसेज आला. यानंतर चालकाने



दंड कसला याबाबत पोलिसांना विचारणा करण्यासाठी परत आला असता पोलिसांनी वाहन चालकाला बेदम मारहाण केल्याचे त्याचे म्हणणे आहे.

हे व्हिडिओ आज समाज माध्यमांवर व्हायरल झाले. हा प्रकार घडत असताना मोहोळचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मोहोळ येथील आमदार राजाभाऊ खरे त्या ठिकाणांहून जात असताना त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलवून असा प्रकारा बाबत नाराजी व्यक्त केली आहे. यावेळी स्थानिकांचा पोलिसांच्या वाहतूक शाखे विरोधात जोरदार संताप दिसत आहे. मात्र या प्रकारात नो एन्ट्री मध्ये घुसल्याने पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केली आणि दंडाची पावती दिली असल्याचा दावा शहरचे पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांनी केला आहे. याबाबत बोलताना त्यांनी मात्र मारहाणीच्या घटनेबाबत बोलणे टाळले आहे. आता संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी समोर येत असून हा संपूर्ण प्रकार चालू अधिवेशनात मांडणार असल्याचा दावा आमदार राजू खरे यांनी केला आहे.

# रेल्वे रूळ ओलांडताना झालेला अपघात अनुचित घटना नाही

## उच्च न्यायालयाचा नुकसानभरपाई देण्यास नकार



■**मुंबई। प्रतिनिधी,**

रेल्वे रूळ ओलांडताना धडक बसून झालेला मृत्यू अनुचित घटना मानली जाऊ शकत नाही, असा निकाल उच्च न्यायालयाने दिला. प्रवाशाने रेल्वे रूळ ओलांडण्याची चूक केलेली असते. अशा स्थितीत प्रवासी भरपाईचा दावा करू शकत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

५ ऑगस्ट २००६ रोजी एका रेल्वे प्रवाशाचा नालासोपारा आणि भाईदर दरम्यान रेल्वे अपघातात मृत्यू झाला होता. त्या मृत प्रवाशाची पत्नी सिंधू देवानंद शिवदास यांनी रेल्वेकडे नुकसानभरपाईसाठी दावा केला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार, पती चालत्या गाडीतून पडल्यामुळे हा अपघात झाला होता. त्यांच्या या दाव्यावर रेल्वे प्रशासनाने आक्षेप घेतला होता. त्याच आधारे रेल्वे दावा न्यायाधिकरणाने मृत व्यक्तीच्या पत्नीला नुकसान भरपाई नाकारली होती.

न्यायाधीकरणाच्या निर्णयाला आव्हान देत मृत प्रवाशाच्या पत्नीने उच्च न्यायालयात दाद मागितली होती. तिच्या याचिकेवर न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या एकलपीठाने सुनावणी घेतली आणि निर्णय दिला. अपघातानंतर प्रवाशाला हॉस्पिटलमध्ये केईएम दाखल करण्यात आले होते. त्यावेळी सोबत असलेल्या मित्राने मृत प्रवाशाला रेल्वे रूळ ओलांडताना मागून येणाऱ्या गाडीने धडक दिल्याने दुखापत झाल्याचे सांगितले. न्यायालयाने जबाब ग्राह्य धरत रेल्वे रूळ ओलांडताना मृत्यू होणे ही अनुचित घटना नसल्याचे निरीक्षण नोंदवले.

# मुलगा असं काही करेल याची पालकांना कल्पनाही नव्हती...



**मुलांमधला संयम आता कमी होत चाललाय**

आत्महत्येसारख्या घटना कधीही अचानक घडत नाही, मुलांमधला संयम आता कमी होत चालल्याचं मानसोपचार तज्ञ सांगतात. डॉ. नितीन भोगे (मानसोपचार तज्ञ) सांगतात की, मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांच्या स्वभावातील बदल लक्षात घेऊन वेळीच पालकांनी लक्ष देऊन उपाय करणं गरजेचं आहे. अशा घटना टाळण्यासाठी पालकांची भूमिका अत्यंत महत्तवाची आहे. मुलांची हौस भागवताना प्रत्येक गोष्ट पालकांनी द्यावीच अशा सवयी लावण्याऐवजी मुलांना नाही ऐकण्याची सवय लावण गरजेचं आहे.

■**सोलापूर। प्रतिनिधी,**

सोलापूरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आई-वडिलांनी हातातला मोबाईल काढून घेतला, आणि मोबाईल पाहण्यासाठी बंदी घातली त्याचा राग मनात ठेवून 13 वर्षाच्या चिमुरड्याने आत्महत्या केली.

हृदय पिळवटून टाकणाऱ्या सोलापुरातल्या पेनुर गावातील या घटनेने अवघं पालकमन हेलावलंय. लहान मुलांमध्ये मोबाईलचा वापर वाढलाय. हा वापर व्यसनाच्या दिशेनं सुरु झालाय. त्यामुळे पालकत्वाची भुमिका आता आणखी आव्हानात्मक झालीय.

**मोबाईलवापरावर बंदी घातल्याने चिमुकल्याचं टोकाचं पाऊल**

मोबाईल हे हातात मावणारं तंत्रज्ञान जनमानसाच्या मनावर परिणाम करत माणसाचा जीव घेऊ लागलंय. सोलापुर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील पेनुर या लहानश्या खेड्यातल्या एका आत्महत्येच्या घटनेने सर्वांना सुन्न केलंय. पेनुरमधील धर्मराज डोके कुटुंबावर त्यांच्या 13 वर्षाच्या चिमुरड्यानं आत्महत्या केल्याने दुखाचा डोंगर कोसळलाय. शेती-भाती करत उपजीवीका भागवणाऱ्या कुटुंबातील यशराजला मोबाईलचं प्रचंड वेड होतं. खेळण्या-बागडण्याच्या वयात यशराज घरात बसून तासन् तास मोबाईल बघायचा, ना जेवण-खाण्याची शुद्ध, ना मैदानी खेळ. याच मोबाईलच्या व्यसनामुळे त्याचे आई-वडीलांनी 1 मार्चला संध्याकाळी त्याच्या हातातला मोबाईल काढून घेतला आणि मोबाईलवापरावर बंदी घातली. हा राग यशराजनं मनात धरून त्याने टोकाचं पाऊल उचलत आईच्याच साडीचा गळफास घेऊन आत्महत्या केली.

**पालकांनी वेळीच मोबाईल अतिवापरावर उपाय करावा**

अवघ्या तेरा वर्षाच्या चिमुकल्याच्या आत्महत्येनं संपूर्ण जिल्हा हळहळला. डोके कुटुंबावर दुखाचा डोंगर कोसळला . मूल गावखेड्यातलं असो अथवा शहरातलं मात्र मोबाइल अति बघणं हे निश्चितच धोकादायक आहे, अशा वयातील मुलं संवेदनशील असतात, पालकांनी वेळीच मोबाईल अतिवापरावर उपाय करत मुलांशी संवाद साधणं गरजेचं आहे. असे आवाहन मोहोळ पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षाकांनी केले आहे.

# शिक्षिकेने विद्यार्थ्याला काठीने मारले, 14 वर्षीय मुलाची दृष्टीच गेली, वडिलांनी सांगितला घटनाक्रम

**मारहाणीत विद्यार्थ्याची दृष्टी गेली**

पीडित विद्यार्थ्यांच्या वडिलांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉक्टरांनी त्याला सांगितले की, मुलाची दृष्टी गेली आहे. तो शाळा व्यवस्थापनावर प्रश्न उपस्थित करतो. पीडितेच्या तक्रारीवरून, शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळेच्या मालकाविरुद्ध वेव्ह सिटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



■**मुंबई। प्रतिनिधी,**

शिक्षिकेनं इयत्ता नववीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला काठीने मारहाण केली. मारहाणीत विद्यार्थ्याच्या डोळ्याला भयंकर इजा झाली. विद्यार्थी पेन पेन उचलत असताना, शिक्षिकेनं त्याला काठीने मारहाण केली. दोन महिने उपचार करूनही, मुलाची दृष्टी पुन्हा आली नाही. यामुळे आता संबंधित शाळेच्या व्यवस्थापनेवर आणि शिक्षक वृदांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**'मुलाच्या डोळ्याची दृष्टी गेली'**

काठीने केलेल्या मारहाणीमुळे डोळ्याला जबर मार लागला होता, यामुळे दुखापत देखील झाली होती. वडिलांचे म्हणणे आहे की, मुलाच्या एका डोळ्यात अजूनही पूर्णपणे दृष्टी आलेली नाही. शाळेच्या संचनालक आणि मुख्याध्यापकांनी मुलाचा वैद्यकीय खर्च भागवण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, अद्याप कोणतीही मदत आलेली नाही. पीडितेनं केलेल्या तक्रारीवरून, शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळेच्या मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**डॉक्टरांनी मोतीबींदू झाल्याचं सांगितलं**

नववीत शिक्षण घेणाऱ्या पीडित विद्यार्थ्याचे वय 14 आहे. तो गिरधीलाला पब्लिक स्कूलमध्ये शिक्षण घेतो. 20 डिसेंबर रोजी तो शाळेत असताना वर्गात त्याचा पेन पडला आणि तो उचलण्यासाठी खाली वाकला. त्याचक्षणी, शिक्षिकेने त्याला काठीने मारले असता, त्याच्या डोळ्याला गंभीर जखम झाली. संबंधित प्रकरणात आरोप आहे की, काठीने मारताना डोळ्यावर फटका बसला. शाळेच्या मुख्याध्यापकांनी मुलाला गावातील डॉक्टरकडे नेले आणि घरी सोडले. एका रुग्णालयात त्याच्यावर ऑपरेशन मुलावर शस्त्रक्रिया करण्यात आली, जिथे डॉक्टरांनी विद्यार्थ्यार्ला मोतीबिंदू झाल्याचं सांगितलं.

# डोंबिवलीतील कॉलेज हादरले! शिपायाने चौथ्या मजल्यावरून उडी घेत संपवले जीवन



**प्राचार्यांच्या केबिनमध्ये काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी दुपारी सुमारे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास प्रवीण चौधरी हे आपल्या आई-वडिलांसह कॉलेजमध्ये प्राचार्यांशी काही कारणास्तव चर्चा करण्यासाठी आले होते. प्राचार्यांच्या कार्यालयात चर्चा सुरू असताना अचानक त्यांनी कॉलेजच्या चौथ्या मजल्यावरील बाल्कनीकडे धाव घेतली आणि क्षणात खाली उडी घेतली. ही घटना इतक्या अचानक घडल्याने उपस्थितांमध्ये एकच गोंधळ उडाला.घटनेनंतर कॉलेज परिसरात खळबळ उडाली. तातडीने त्यांना रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र तेथे उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच रामनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

■**डोंबिवली। प्रतिनिधी,**

डोंबिवली पूर्वेकडील दत्तनगर परिसरातील प्रगती कॉलेजमध्ये गुरुवारी दुपारच्या सुमारास अत्यंत धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. कॉलेजमध्ये कार्यरत असलेल्या लायब्ररी शिपायाने कॉलेजच्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केली. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे, या घटनेमुळे कॉलेज परिसरासह डोंबिवली शहरात खळबळ उडाली आहे. प्रवीण चौधरी (42) असे मृत शिपायाचे नाव असून ते ठाकुर्ली येथील खंबाळपाडा परिसरात राहत होते. ते गेल्या काही वर्षापासून डोंबिवली पूर्वेकडील दत्तनगर येथील प्रगती कॉलेजमध्ये लायब्ररी शिपाई म्हणून कार्यरत होते.

**चौधरी यांचा स्वभाव तापट**

रामनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवीण चौधरी यांचा स्वभाव तापट असल्याची माहिती समोर आली असून त्यांच्या कामाच्या वर्तनाबाबत कॉलेज प्रशासनाकडून यापूवीर्ही त्यांना अनेकदा समज देण्यात आली होती. या संदर्भात चर्चा करण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना कॉलेजमध्ये बोलावण्यात आले होते. चर्चेदरम्यान प्रवीण यांना अचानक राग आला आणि रागाच्या भरात त्यांनी कॉलेजच्या चौथ्या मजल्यावरून उडी घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

# औषध न घेतल्याने पेशंटची हत्या, वॉर्डबॉयसह चौघे ताब्यात... नेमकं काय घडलं?



**औषध घेण्यास नकार दिल्याने मारहाण**

ही घटना सुरतच्या डुमास परिसरातील 'रीवा व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन केंद्रात' घडली. धवल राठोड (32) असे मृत रुग्णाचे नाव असून त्याला 28 फेब्रुवारी रोजी उपचारासाठी या केंद्रात दाखल करण्यात आले होते. 1 मार्चच्या रात्री धवलने औषध घेण्यास स्पष्ट नकार दिला, ज्यावरून केंद्रातील कर्मचाऱ्यांशी त्याचा वाद झाला. या वादाचे रूपांतर हिंसक मारहाणीत झाले आणि कर्मचाऱ्यांनी संतापून धवलला बेदम मारहाण केली. त्याची प्रकृती खालावल्याने त्याला 108 रुग्णवाहिकेने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, मात्र तिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

■**मुंबई। प्रतिनिधी,**

एका रुग्णाने औषध न घेतल्याने त्याला मारहाण करुन त्याची हत्या करण्यात आली आहे. गुजरातच्या सुरतमधील एका नशामुक्ती केंद्रात ही घटना घडली. एका 32 वर्षीय रुग्णाने केवळ औषध घेण्यास नकार दिल्याने केंद्रातील वॉर्ड बॉय आणि इतर तिघांनी मिळून या रुग्णाला मारहाण केली. या मारहाणीत रुग्णाचा जीव गेला. याप्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून चारही आरोपींना अटक केली आहे.

सहाय्यक पोलीस आयुक्त श्वेता डॅनियल यांनी दिलेल्या माहितीनुसार, धवलच्या शरीरावर जखमेच्या खुणा आढळल्याने पोलिसांनी संशय व्यक्त करत मृतदेह पोस्ट मार्टमसाठी पाठवला होता. या अहवालात धवलचा मृत्यू डोके, कंबर आणि शरीराच्या इतर भागांवर झालेल्या गंभीर जखमांमुळे झाल्याचे स्पष्ट झाले. यानंतर पोलिसांनी केंद्रातील इतर कर्मचारी आणि रुग्णांची सखोल चौकशी केली असता, औषध न घेतल्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात कर्मचाऱ्यांनी त्याला लाठ्यांनी मारल्याचे उघड झाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com